# रोजगार हमी योजना समिती

## (२०१०-२०११)

सत्यमेव जयते

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

# चौदावा अहवाल

## (नंदूरबार जिल्ह्याच्या संबंधात)

( अहवाल दिनांक २३ डिसेंबर २०११ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
२०११

# रोजगार हमी योजना समिती
# (२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

# चौदावा अहवाल
(नंदूरबार जिल्ह्याच्या संबंधात)

( अहवाल दिनांक २३ डिसेंबर २०११ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

# रोजगार हमी योजना समिति

## (सन २०१०-२०११)

**समिती प्रमुख :**

(१) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.

(३) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

(४) श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.

(५) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.

(६) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.

(७) श्री. सिताराम घनदाट, वि.स.स.

(८) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.

(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.

(११) श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.

(१२) श्री. राजीव देशमुख, वि.स.स.

(१३) श्री. दादाराव केचे, वि.स.स.

(१४) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

(१५) श्री. सिद्रामप्पा पाटील, वि.स.स.

(१६) श्री. शिवाजी कर्डिले, वि.स.स.

(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.

(१८) श्री. संजय राठोड, वि.स.स.

(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.

(२०) श्री. मंगेश सांगळे, वि.स.स.

(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.

(२२) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(२४) श्री. केशवराव मानकर, वि.प.स

(२५) रिक्त **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

२) श्री. यु. के. चव्हाण, सह सचिव

३) श्री. विलास आठवले, उप सचिव

---

**टीप :** * श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स. यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै २०१० रोजी समाप्त झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.अनिल तटकरे, वि.प.स. यांची दिनांक १५ ऑक्टोबर २०१० रोजी मा.सभापतींनी सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे.

** श्री. किरण पावसकर, वि.प.स.यांनी दिनांक ७ जानेवारी २०११ रोजी त्यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने अनुक्रमांक २५ वरील पद रिक्त दर्शविण्यात आले आहे.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना :** | |
| १ | कामाचे वार्षिक नियोजन .. .. .. .. | १ |
| २ | निधीचा पुरवठा व खर्च .. .. .. .. | २ |
| ३ | अपूर्ण कामे .. .. .. .. | ३ |
| ४ | जवाहर विहिरी .. .. .. .. | ७ |
| ५ | सुधारीत अंदाजपत्रक .. .. .. .. | ८ |
| ६ | गैरव्यवहाराची प्रकरणे .. .. .. .. | ९ |
| ७ | सामाजिक वनीकरण .. .. .. .. | १२ |
| | **परिशिष्ट :** | |
| | (एक) - अपूर्ण कामे .. .. .. .. | १३ |
| | (दोन) - गैरव्यवहाराची प्रकरणे .. .. .. .. | ३१ |
| | (तीन) - बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त .. .. .. .. | ४१ |

## प्रस्तावना

मी, रोजगार हमी योजना " समिती प्रमुख " या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीचा चौदावा अहवाल सादर करीत आहे.

मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद, यांनी अनुक्रमे दिनांक २५ फेब्रुवारी २०१० व २६ फेब्रुवारी २०१० रोजी नियुक्त केलेल्या सदस्यांची सन २०१०-२०११ या वर्षासाठी समिती गठीत केली. समितीने दिनांक ५ व ६ जानेवारी २०११ रोजी नंदूरबार जिल्ह्यास भेट दिली होती. त्यावेळी झालेल्या जिल्हा बैठकीमध्ये समितीने पाठविलेली प्रश्नावली व जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने रोहयोच्या कामांना प्रत्यक्ष भेटी देऊन केलेल्या पाहणीत आढळून आलेल्या त्रुटी तसेच रोहयो अंतर्गत कामे करणाऱ्या मजुरांना आलेल्या अडचणी व ही योजना राबवितांना कार्यान्वयीन यंत्रणांना आलेल्या उणीवा व अडचणी याबाबत लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्ह्यातील रोहयोची कामे करणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांची पाहणी करताना समितीसमोर आलेली प्रकरणे व जिल्हा बैठकीमध्ये कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच त्यांनी कामांच्या पूर्ततेसंबंधी दिलेल्या आश्वासनासंदर्भात प्रश्नावली तयार करून ती नियोजन विभागाकडे (रोहयो) पाठवून शासनाने त्याबाबत केलेल्या पूर्ततेबाबतची माहिती त्यांचेकडून समितीने मागविली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १७ नोव्हेंबर २०११ रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त अहवाल जिल्हा भेटीच्या व बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

समितीच्या कामकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल, समितीचे सर्व सदस्य, नंदूरबार जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, नंदूरबार जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नंदूरबार व योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणांचे सर्व अधिकारी यांची समिती आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीच्या निमंत्रणावरून समितीच्या बैठकीस उपस्थित राहून समितीला जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने सदर अहवाल दिनांक २२ डिसेंबर २०११ रोजी विचारात घेतला व संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २२ डिसेंबर २०११.

**प्रा. विरेंद्र जगताप,**
समिती प्रमुख
रोजगार हमी योजना समिती.

## પ્રસ્તાવના

[illegible]

[illegible] તા. ૧૮ ફેબ્રુઆરી ૨૦૧૦ અને ૨૬ ફેબ્રુઆરી ૨૦૧૦ [illegible]

[illegible] ૨૦૧૦-૨૦૧૧ [illegible] તારીખ ૮ અને ૯ જાન્યુઆરી ૨૦૧૧ [illegible]

[illegible]

[illegible] ૧૭ ઓક્ટોબર ૨૦૧૧ [illegible]

[illegible]

[illegible] ૨૨ ફેબ્રુઆરી ૨૦૧૧ [illegible]

દિનેશ ભગત,
મુંબઈ,
તારીખ : ૨૨ ફેબ્રુઆરી ૨૦૧૧.

ડૉ. [illegible],
સમિતિ પ્રમુખ
ડાહ્યાભાઈ વીરા ચારણ સમિતિ.

रोजगार हमी योजना समिती

## अहवाल

**(१) कामाचे वार्षिक नियोजन :**

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक ५ व ६ जानेवारी २०११ रोजी नंदूरबार येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेत सन २००७ ते २०१० या कालावधीतील "कामाचे वार्षिक नियोजन" संदर्भात माहिती "निरंक" दाखविण्यात आली आहे. समितीच्या असे निदर्शनास आले की, सर्वच यंत्रणांनी "कामाचे वार्षिक नियोजन" या प्रश्नांसबंधीची माहिती "निरंक" दिलेली आहे. यांसदर्भात विचारणा केली असता समितीला उप जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, सदर कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेचे नियोजन नसल्यामुळे माहिती "निरंक" देण्यात आली आहे.

समितीने अशी विचारणा केली की, सन २००९-२०१० च्या वार्षिक नियोजनामध्ये व्यक्तीगत लाभदायक योजनांची माहिती द्यावी. त्यावर जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी लेखी स्वरूपात खालीलप्रमाणे माहिती दिली :—

**सन २००९-२०१० चे वार्षिक नियोजन आराखड्याचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे :—**

| अनुक्रमांक | कामाचे प्रकार | एकूण कामे (संख्या) | कामावर झालेला एकूण खर्च (लाखात) | अपेक्षित खर्च (लाखात) | अपेक्षित मनुष्य दिवस निर्मिती (लाखांत) | एकूण खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | जवाहर विहिरी (संख्या) | ८१८ | ८०९ | ८०९ | ७.७० | १०० % |
| २ | फलोत्पादन (हेक्टर) | लक्षांक ११६५ (हेक्टर) | .... | .... | .... | .... |
| | | साध्य ९४६.४५ (हेक्टर) | ४००.१७ | ३९७.०० | ३.९७ | १०० % |
| ३ | तुती लागवड (हेक्टर) | .... | .... | .... | .... | .... |

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ नुसार महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना जिल्ह्यात केव्हापासून लागू करण्यात आली व योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी केव्हापासून सुरू करण्यात आली अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना नंदुरबार जिल्ह्यात प्रथम टप्प्यामध्ये माहे फेब्रुवारी, २००६ पासून सुरु करण्यात आली आहे त्यावर समितीने या योजनेअंतर्गत जिल्हानिहाय किती निधी मिळाला व त्यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली ? अशी विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी याबाबत खालीलप्रमाणे तपशील दिला :—

| वर्ष | एकूण प्राप्त निधी | झालेला एकूण खर्च | शिल्लक असलेला निधी |
|---|---|---|---|
| २००७-२००८ | १९००.७९ | १८८०.५३ | २०.२६ |
| २००८-२००९ | ६१९३.४४ | ५१९०.६० | १००४.८४ |
| २००९-२०१० | ७२५८.७४ | ३८३१.०६ | ३४२७.६८ |
| २०१०-२०११ | ४०७५.८६ | ९२४.४५ | ३१५१.४१ |

त्यानंतर समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेस वार्षिक नियोजन आराखड्यास मंजुरी कोणी व केव्हा दिली? त्यावर जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी वार्षिक नियोजन आराखड्यास प्रत्येक वर्षी जिल्हापरिषदेच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी प्रदान केलेली आहे याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे सादर केला :—

| अनुक्रमांक | नियोजन आराखड्यांचे वर्ष | सर्वसाधारण सभेची मंजुरी | |
|---|---|---|---|
| | | ठराव क्रमांक | दिनांक |
| १ | २००७-२००८ | १७९ | ८/१/२००७ |
| २ | २००८-२००९ | २४६ | १२/०२/२००८ |
| ३ | २००९-२०१० | २८९ | २२/१२/२००८ |

या संदर्भात दिनांक १७ नोव्हेंबर २०११ रोजी विभागीय प्रधान सचिवांची नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेकडे निधी असताना यंत्रणेला कामापोटी अग्रीम रक्कम का देण्यात आली नाही ? त्यावर जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी समितीला अशी माहिती दिली की, नंदुरबार जिल्ह्यात मजुरांना मजुरीचे वाटप हे पोस्टामार्फत होत असल्याने संबंधित तालुक्यातील पोस्टाकडे अग्रीम रक्कम जमा करण्यात येते. कुशल कामासाठी तहसीलदार व गट विकास अधिकारी यांना अग्रीम रक्कम दिली जाते. प्रशासकीय खर्चासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच सर्व यंत्रणांना अग्रीम रक्कम देण्यात आलेली आहे.

त्यानंतर समितीने अशी विचारणा केली की, जर गट विकास अधिकारी यांना अग्रिम दिला जातो तर हा प्रश्न कसा उपस्थित झाला ? त्यावर विभागीय प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीला अशी माहिती दिली की, राज्यातील सर्व तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांना अग्रिम दिला जातो. जिल्हाधिकाऱ्यांकडे निधी दिल्यानंतर ते त्याचे वितरण करतात. काही जिल्ह्यांमध्ये अशी परिस्थिती आहे की, अग्रिम रक्कम दिलेली नाही. समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा बैठकी अगोदर समितीने अनौपचारिक चर्चा केली होती व त्यामध्ये हा मुद्दा उपस्थित झाला होता. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधितांना पोस्टामार्फत अग्रीम रक्कम दिली जाईल असे सांगितले. यासंदर्भात सर्व गट विकास अधिकारी यांना अग्रीम रक्कम देण्यात आली आहे काय? असे समितीने विचारले असतां अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., नंदूरबार यांनी समितीला अशी माहिती दिली की, सर्व गटविकास अधिकारी यांच्या खात्यावर २५ लाख रुपये अग्रीम रक्कम म्हणून जमा करण्यात आली आहे. त्यानंतर विभागीय प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी अशी माहिती दिली की,पूर्वी विभागाकडून ग्रामपंचायतीना अग्रीम रक्कम देण्यात येत होती परंतु, खर्चाचा तपशील त्यांच्याकडून प्राप्त होत नव्हता. इतर राज्यांमध्ये कोणती कार्यपद्धती आहे, याचीही चौकशी विभागाने केलेली आहे. गुजरात, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये देखील अशीच कार्यपद्धती आहे. परंतु, आपल्याकडे माहिती प्राप्त होण्यामध्ये अडचण असल्यामुळे गट विकास अधिकारी यांच्या खात्यात अग्रीम रक्कम जमा करण्यात येते. कुशल कामासाठी ग्रामपंचायत ही अंमलबजावणी यंत्रणा असल्यामुळे २५ टक्के अग्रीम रक्कम देण्यात येते.

अभिप्राय व शिफारस :

**समितीच्या दिनांक ५ व ६ जानेवारी २०११ रोजी नंदूरबार जिल्हा बैठकीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तकात सन २००७ ते २०१० या कालावधीच्या माहितीत "कामाचे वार्षिक नियोजन" या संदर्भातील माहिती "निरंक" देण्यात आली असल्याने समितीने सदर माहिती निरंक का दिली ? अशी विचारणा केली असता, संबंधित अधिकारी समितीला अपेक्षित माहिती देऊ शकले नाहीत. त्यानंतर समितीला पाठविलेल्या लेखी माहितीमध्ये सन २००९-२०१० चे वार्षिक नियोजन आराखड्याचे स्वरूप समितीला पाठविण्यात आले त्यामध्ये जवाहर विहीरी (संख्या), फलोत्पादन (हेक्टर) आणि तुती लागवड (हेक्टर) यासंदर्भात एकूण कामे, कामावर झालेला खर्च, अपेक्षित खर्च, मनुष्य दिवस निर्मिती एकूण खर्च, टक्केवारी, इत्यादी माहिती समितीस सादर केली.**

**समितीला वेळीच कामाच्या वार्षिक नियोजनासंदर्भात माहिती न दिल्यामुळे समिती यासंदर्भात आवश्यक त्या बाबी तपासू शकली नाही. कामाचे वार्षिक नियोजन वेळीच करणे आवश्यक असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. नंदूरबार जिल्हा परिषदेने कामाचा वार्षिक नियोजन आराखडा वेळेत केल्याचे दिसून येत नाही. यासंदर्भात समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व यापुढील काळात कामाचे वार्षिक नियोजन हे विहित वेळेत करण्यात यावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

(२) निधीचा पुरवठा व खर्च :

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक ५ व ६ जानेवारी २०११ रोजी नंदुरबार येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमध्ये " निधीचा पुरवठा व खर्च " या संदर्भात दिनांक १ जुलै २००७ ते ३० सप्टेंबर २००७ या कालावधीत विविध यंत्रणांची माहिती " निरंक " दाखविण्यात आली आहे, तसेच कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदुरबार या यंत्रणेकडे रु.६०.१५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला असून मजुरांच्या मजुरीकरिता खर्च झालेली रक्कम रु.३९.८० व त्यांची एकूण खर्चाच्या रक्कमेची टक्केवारी ६६.१६% इतकी आहे. मजूरांच्या सोयी-सवलतींसाठी खर्च झालेली रक्कम रु.०.३१ व त्याची एकूण खर्चाच्या रक्कमेची टकेवारी ०.५३% इतकी असून कुशल बाबीअंतर्गत कंत्राटदारांकडून घेतलेल्या कामावरील खर्च रु. २०.०४ व त्या खर्चाच्या रकमेची टक्केवारी ३३.३१% अशी आहे. तसेच खर्च करण्यात आलेली एकूण रक्कम व कुशल बाबींवर खर्च झालेली रक्कम तसेच एकूण खर्च झालेल्या रकमेची टक्केवारी देण्यात आलेली नाही आणि अकुशल कामासंदर्भात निर्माण झालेले मनुष्य दिवस ०.५८ इतके आहेत.

दिनांक १ जानेवारी २००८ ते ३१ मार्च २००८ या तिमाहीत कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास, नंदूरबार या यंत्रणेने जिल्हाधिकाऱ्यांकडे निधीची मागणी रुपये ६०.१५ लाख इतकी केली होती. ही रक्कम दिनांक १७ मार्च, २००८ रोजी प्राप्त झाली. त्यातील मजुरांच्या मजुरीकरीता खर्च झालेली रक्कम रु.३९.८० लाख असून त्याची एकूण खर्चाच्या रकमेची टक्केवारी ६६.१६% असून मजुरांच्या सोयी-सवलतीकरीता रु.०.३१ लाख खर्च केली असून त्यातील एकूण रकमेच्या ०.५१% रक्कम खर्च झाली आहे. कुशल कामाअंतर्गत कंत्राटदारांकडून घेतलेल्या कामावरील खर्च रु.२०.०४ लाख इतका खर्च करण्यात आला असून एकूण रु. ६०.१५ इतका खर्च करण्यात आला आहे तसेच कुशल बाबींवर खर्च करण्यात आलेली रक्कम रुपये २०.०४ लाख असून याची टक्केवारी ३३.३१% असल्याचे दर्शविण्यात आली आहे तसेच अकुशल कामासंदर्भात निर्माण झालेले मनुष्य दिवसांची टक्केवारी ०.५८ इतकी आहे.

कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदुरबार यांनी दिनांक १ जानेवारी २०१० ते ३१ मार्च २०१० या तिमाहित यंत्रणेने जिल्हाधिकारी यांचेकडे रु.७.३८ लाख इतक्या रकमेच्या निधीची मागणी केली. यंत्रणेस निधीची संपूर्ण रक्कम देण्यात आली. त्यातील मजुरांकरिता खर्च करण्यात आलेली रक्कम रु.४.८० लाख व त्यांची एकूण खर्च झालेल्या रकमेची टक्केवारी ६५.०५ टक्के व कुशल बाबींच्या अंतर्गत कंत्राटदारांकडून घेतलेल्या कामावरील खर्च रु.२.५८ लाख असून त्याची टक्केवारी ३४.९५ टक्के असून एकूण खर्च करण्यात आलेली रक्कम रु.७.३८ लाख आहे.

समितीला पुरविलेल्या या माहितीसंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदुरबार या यंत्रणेने दि. १ जानेवारी २००८ ते ३१ मार्च २००८ या कालावधीत मजुरांच्या सोयी सवलतीवर फक्त रु. ०.३१ लाख इतक्या कमी प्रमाणात रक्कम खर्च करण्याची व दि. १ जानेवारी २०१० ते ३१ मार्च २०१० मध्ये मजूरांच्या सोई-सवलतींवर कोणतीही रक्कम खर्च न करण्याची कारणे काय आहेत? यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, नंदुरबार जिल्ह्यातील वेगळ्या भागात वेगळ्या यंत्रणा काम करीत असतात. अक्कलकुवा तसेच इंतर तालुक्यातील जवळपास ५९ हजार मजूर स्थलांतर करीत असतात. आता एक नवीन उपक्रम शिबिरांच्या माध्यमातून सुरू केला आहे. या भागातून एवढ्या मोठ्या प्रमाणात मजुरांचे स्थलांतर होऊ नये म्हणून त्यासाठी त्यांनी यंत्रणांच्या बैठका घेतल्या. त्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधीसमवेत बैठका घेतल्या, परंतु तरीसुद्धा मजुरांचा पाहिजे त्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला नाही. दिनांक १५ व १६ डिसेंबर २०१० रोजी आक्राणी तालुक्याला भेट दिली असता सदरहू भेटीच्या वेळी किती लोकांनी काम नसल्याने आतापर्यंत स्थलांतर केले याबाबतची माहिती जाणून घेतली. काकरदा येथे सर्व यंत्रणा व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे समवेत शिबिरे आयोजित करून ज्या ठिकाणी कामाची आवश्यकता आहे त्या ठिकाणी काम देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. आक्राणी, अक्कलकुवा आणि तळोदा या तालुक्यांतून मजुरांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत असते. ग्रामपंचायतीने जास्तीत जास्त ५० टक्के काम मजुरांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यातल्या त्यात उत्पादनाशी संबंधित काम घेण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तालुकावार बैठका घेऊन मजुरांना काम करण्यास उद्युक्त केलेले आहे. आक्राणी तालुक्यामध्ये जास्तीत जास्त जिल्हा परिषदेमार्फत ८० टक्के काम सुरू केले आहे. इतर तालुक्यात सुद्धा यावर्षी पावसाळा लांबल्यामुळे उत्पादनाशी संबंधित काम घेण्यास थोडा उशिर झालेला आहे. तसेच निधीची अजिबात कमतरता नसून ३६ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

अभिप्राय व शिफारशी :

**समितीने दिनांक ५ व ६ जानेवारी २०११ रोजी नंदूरबार जिल्हा बैठकीच्या वेळी समितीस पुरविलेल्या माहितीत "निधीचा पुरवठा व खर्च" यासंदर्भात दिनांक १ जुलै २००७ ते ३० सप्टेंबर २००७ या कालावधीत विविध यंत्रणांची माहिती निरंक देणे. कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदूरबार या यंत्रणेकडे ६०.१५ लाख रुपयाचा निधी प्राप्त झाला आहे. मजुरांच्या सोयी-सवलतींवर खर्च झालेली रक्कम रु.०.३१ व त्यांच्या एकूण खर्चाच्या रकमेची टक्केवारी ०.५३ % इतकी असून कुशल बाबीअंतर्गत कंत्राटदारावर घेतलेल्या कामांवरील खर्च रु.२०.०४ व त्याच्या एकूण खर्चाच्या रकमेची टक्केवारी ३३.३१ अशी असल्याने कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदूरबार या यंत्रणेकडे मजुरांच्या सोयी-सवलतींवर नगण्य स्वरूपात खर्च केला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. या भागातील मजूर हे कामासाठी स्थलांतर करीत असून अक्कलकुवा तसेच इतर तालुक्यांतील जवळपास ५९ हजार मजूरांनी स्थलांतर केले आहे. संबंधित यंत्रणेच्या कामाचे वार्षिक नियोजन नाही तसेच मजुरांना रोजगार हमी योजनेच्या कामाची व्यवस्थित माहिती दिली जात नाही. मजुर स्थलांतर करत असल्यामुळे केवळ त्यांच्या मजूरीबाबत प्रश्न उपस्थित होत नसून त्यामुळे संपूर्ण कुटुंब विस्कळीत होण्याचा धोका आहे. यात त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर देखील परिणाम होऊ शकतो. म्हणून मजुरांचे मोठ्या प्रमाणात होणारे स्थलांतर रोखण्यासाठी केवळ शिबिरे घेऊन उपयोग होत नसून जिल्ह्यात कोठे व कोणत्या ठिकाणी कामे उपलब्ध आहेत किती मजुरांची आवश्यकता आहे, मजुरांना किती मजुरी देण्यात येत आहे. त्याचबरोबर मजुरीच्या कोणकोणत्या सोयी-सवलती उपलब्ध आहेत, अशाप्रकारे माहिती स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन वा स्थानिक ठिकाणी दवंडी वा जनजागृती करून मजुरांना रोजगार हमी योजनेच्या कामांवर आकर्षित केल्यास त्यांचे स्थलांतर रोखले जाऊ शकते असे समितीचे ठाम मत आहे.**

**जिल्ह्यातील मजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी संबंधित यंत्रणांनी कामाचा वार्षिक नियोजन आराखडा विहित वेळेत तयार करून जिल्ह्यात कोठे व कोणकोणत्या ठिकाणी कामे सुरू होणार आहेत याची आगाऊ सूचना तसेच त्या कामावर मजुरांना प्रत्येकी किती मजुरी व विशेष लाभ मिळतील याची माहिती स्थानिक वृत्तपत्रात देऊन प्रसिद्ध करावी तसेच ज्या ठिकाणी यंत्रणा काम सुरू करणार आहे त्याठिकाणी दवंडीद्वारे मोठ्या प्रमाणावर जनजागृती करून स्थानिक वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे प्रसिद्धी द्यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

३) अपूर्ण कामे :

समितीच्या दिनांक ५ व ६ जानेवारी २०१० रोजी नंदूरबार येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्यावेळी दिलेल्या माहिती पुस्तिकेनुसार जिल्ह्यात यंत्रणानिहाय अपूर्ण असलेली १ ते ५ वर्षांतील १५ कामे आणि ६ ते १० वर्षांतील २४ कामे तसेच १० वर्षांवरील १० कामे अशी एकूण ४९ कामे अपूर्ण असून सदर कामे कुशल कामा-अभावी, वनहरकतीमुळे, जमीन मालक हरकत तसेच मजुराअभावी व सुधारीत अंदाज पत्रकामुळे आणि इतर कारणांमुळे अपूर्ण असल्याचे समितीच्या निदर्शनास आले **(परिशिष्ट १ पहावे.)**.

त्यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा या यंत्रणासह मिळून एकूण ४९ अपूर्ण कामे आहेत. सदर अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत? यावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी समितीला अशी माहिती दिली की, वनहरकतीमुळे एक काम बंद

आहे. सुधारित अंदाजपत्रकामुळे २ कामे व इतर कारणांमुळे २ कामे अपूर्ण आहेत. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, दोन कामे कुशल निधीअभावी बंद आहेत त्यासंबंधी खुलासा करावा, त्यावर कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी समितीला अशी माहिती दिली की, कायेली विहीर कंकाळा, रस्ता भाग-१ कि.मी. ०/०० ते १/१४० चे व कायेली विहीर कंकाळा रस्ता भाग-१ कि.मी. १/४५० ते २/९०० चे असे मिळून दोन कामे होती. सदर दोन्ही कामे किरकोळ स्वरूपाची आहेत. कायेली विहीर कंकाळा रस्ता भाग-१ (०/०० ते १/४५०) च्या उर्वरित कामाचे अंदाजपत्रक रु.०.८८ लाख रकमेचे तयार करून या कार्यालयाचे पत्र जा.क्र.प्रशा-३/३८०१, दिनांक ८ जुलै २००९ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केले आहे. कायेली विहीर कंकाळा रस्ता भाग-१ (कि.मी. १/४५० ते २/९००) च्या उर्वरित कामाचे अंदाजपत्रक रुपये १.३८ लाख रकमेचे तयार करून या कार्यालयाचे पत्र जा.क्र.प्रशा-३/३८०१, दिनांक ८ जुलै २००९ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केले आहे. सदर दोन्ही कामे दोन महिन्यांत पूर्ण करण्यात येतील.

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी** ६ ते १० वर्षे कालावधीतील अपूर्ण कामे वगळण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांना सादर केले असल्याने या प्रस्तावावर कोणती कार्यवाही करण्यात आली? अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, शासन परिपत्रक क्रमांक रोहयो-०८/प्र.२८/रोहयो, दिनांक १० जून २००८ नुसार सदर काम हे ६०.४० % या प्रमाणात बसत नसल्यामुळे व विभागाचा लेखाशिर्ष ५०५४ मार्ग व पुल नाबार्ड-१४ अंतर्गत असल्यामुळे काम वगळणे बाबतचा प्रस्ताव पत्र क्र.प्रशा/३/४५३१, दिनांक २५ ऑगस्ट २००८ नुसार प्राप्त झाला आहे. सदर कामे रोजगार हमी योजनेतून वगळण्याचा प्रस्ताव दिनांक १३ एप्रिल २०१० रोजी प्राप्त झाला आसून. सन २००५ मध्ये नवीन कायदा आल्यामुळे वनहरकत लागू होत नाही.

त्यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा या यंत्रणेची प्रगतीपथावर असलेली कामे किती दिवसात पूर्ण करणार आहात? त्यावर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांनी उर्वरित कामे सहा महिन्यात पूर्ण करण्यात येतील असे सांगितले. समितीने सहा महिन्यांमध्ये कामे पूर्ण केल्यानंतर त्यासंबंधीचा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश दिले.

**कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार** या यंत्रणेची ६ ते १० वर्षे कालावधीतील अपूर्ण कामे केव्हा पूर्ण करण्यात येतील? अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी ६ ते १० वर्ष कालावधीतील एकूण अपूर्ण कामांची संख्या १२ होती. त्यातील ९ कामे पूर्ण झाली आहेत. या कामाचे कुशल देयक देणे बाकी आहे. कुशल देयके जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेली आहेत अशी माहिती दिली. त्यावर समितीने कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नंदूरबार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कुशल देयकाची मागणी केली आहे काय? असे विचारले असता जिल्हाधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार या यंत्रणेची नऊ कामे पूर्ण झाली आहेत. फक्त कुशल देयक बाकी आहेत. तसेच कुशल कामासाठी निधीची मागणी केलेली आहे त्यासंबंधातील मोजमाप पुस्तिकेचे रेकॉर्डस् उपलब्ध आहेत. निधीची अडचण येणार नाही. यात समन्वयाचा प्रश्न निर्माण झाला असल्याबाबतची माहिती दिली.

नंदूरबार जिल्हा हा आदिवासी जिल्हा आहे. आदिवासी शेतकरी हा वाड्या-वस्त्यावर किंवा उंच असणाऱ्या भागात राहतो. त्या ठिकाणी पाण्याचे कोणतेही स्त्रोत नाही. त्या ठिकाणी पाझर तलाव निर्माण केले तर त्यांची शेती ओलिताखाली येण्यास मदत होणार आहे. परंतु महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पाझर तलावासाठी आदिवासींची जमीन घेण्यात येऊ नये असे शासनाचे आदेश असल्याने सद्यःस्थितीत कामे बंद आहेत. अशाप्रकारचे आदेश आहेत काय ? असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे, स्थानिकस्तर, धुळे यांनी अशा प्रकारचा शासन निर्णय नाही परंतु या विषयी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत धुळे जिल्ह्यातील पाझर तलाव/गावतलाव या कामाचे अंदाजपत्रक व आदिवासी भूधारकांचे शेत जमिनीबाबतचे अंदाजपत्रके या संदर्भात कार्यवाही करताना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम, २००५ अंतर्गत नियम ५.१.५ मध्ये असे म्हटले आहे की, NREGA resources should not be used for land acquisition. Land belonging to small and marginal farmers or SC/ST landowners cannot be acquired or donated for works under the programme. अशा प्रकारच्या गाईडलाईन्स आहेत असे सांगितले. त्यावर समितीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संदर्भात ॲक्ट नाही. या फक्त गाईडलाईन्स आहेत. परंतु गाईडलाईन्सप्रमाणे यासंदर्भात निर्णय घ्यावयाचा असल्यास यामध्ये अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या संमतीने जमिनी संपादित केल्या तर हा विषय संपण्यास मदत होईल अशी समितीची अपेक्षा आहे.

आदिवासी शेतकरी भूमिहीन होऊ नये याकरिता त्यांना संरक्षण मिळाले पाहिजे अशी समितीची प्रामाणिक इच्छा आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने किंवा प्रलोभने दाखवून घेतली जाऊ नये अशा प्रकारची कार्यवाही करण्यापूर्वी त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेण्याची गरज आहे. याकरिता कामे थांबविली जावू नयेत, काम सुरू करण्यापूर्वी आदिवासी शेतकऱ्यांकडून संमतीपत्र घेण्याची आवश्यकता आहे असे समितीने निदेश दिले.

दिनांक १७ नोव्हेंबर २०११ रोजी विभागीय प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली. त्यावेळी रोजगार हमी योजनातंर्गत अपूर्ण असलेल्या नंदुरबार जिल्ह्यातल्या शेततळ्यांची व रस्त्यांची कामे यांची सद्यःस्थिती काय आहे? त्यासाठी किती खर्च झाला ? शासनाकडून किती निधी देण्यात आला? या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यांत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत एकूण १४३ शेततळ्यांची कामे हाती घेण्यात येऊन ती पूर्ण करण्यात आली आहेत. एकूण २३ गावाअंतर्गत रस्त्यांची कामे सुरू करण्यात आली होती. त्यापैकी १४ कामे पूर्ण करण्यात आली असून ९ कामे अपूर्ण आहेत. त्यातील ८ कामांचे मातीकाम पूर्ण झाले असून कुशल काम बाकी आहे. १ काम गावातील लोकांच्या हरकतीमुळे बंद आहे. ८ रस्त्यांची कुशल कामे या वर्षी पुर्ण करून घेण्यात येतील अशी माहिती समितीला दिली.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार या यंत्रणेच्या अपूर्ण असलेल्या पाच कामांची सद्य:स्थिती काय आहे? याबाबत समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकारी, यांनी अशी माहिती दिली की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदूरबार या यंत्रणेकडे पाच रस्त्यांची कामे अपूर्ण आहेत. सद्य:स्थितीत पाच कामांपैकी दोन कामे रोजगार हमी योजनेमधून भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहेत. एक काम इतर योजनेतून पूर्ण झालेले असून एक काम प्रगतीत आहे. वनहरकतीमुळे एक काम सध्या बंद आहे. कामनिहाय सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

(१) कायेली विहीर कंकाळा भाग-१ काम भौतिकदृष्ट्या माहे मे-२०११ मध्ये पूर्ण झाले.

(२) कायेली विहीर कंकाळा भाग-२ काम भौतिकदृष्ट्या माहे मे-२०११ मध्ये पूर्ण झाले.

(३) शहादा वैजाली रस्ता कि.मी. २१ ते २६ काम इतर योजनेतून पूर्ण झालेले आहे.

(४) शहादा वैजाली-आमलाड रस्ता कि.मी. १६ ते २१ इतर योजनेतून काम प्रगतीत आहे.

(५) कार्ली ते कंढरे हे काम वन हद्दीतून जात असल्यामुळे दिनांक २४ मे २००२ पासून बंद आहे.वन जमीन निर्वनीकरणाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सध्या त्यावरील त्रुटी पुर्ततेची कार्यवाही सुरु आहे.

समितीने कळवा महु या रस्त्यासाठी मूळ अंदाजपत्रकात खर्चाची तरतूद म्हणून रुपये १ लाख २४ हजार इतके होते. त्यावर रुपये ६ लाख ७३ हजार रुपये खर्च झाले. तरीसुद्धा रस्ता अपूर्ण राहण्याची कारणे काय? असे विचारले असता कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हापरिषद, नंदूरबार यांनी सदर रस्त्याची मूळ अंदाजपत्रकीय किंमत रुपये १.२४ लाख नसून रुपये १६.२० लाख एवढी असल्याचे समितीला सांगितले. त्यावर समितीला देण्यात आलेल्या माहितीमध्ये अनेक ठिकाणी चुका झाल्या आहेत. पहिल्या भागामध्ये आपण रुपये १८.२४ लाख एवढी रक्कम दाखविली आहे आणि आता रुपये १६.२० लाख दाखविली आहे. त्यामुळे रुपये १८.२४ लाख व रुपये १६.२० लाख यापैकी खरी रक्कम कोणती आहे या कामाचे अंदाजपत्रक समितीला दाखवावे? असे सांगितले असता यावर विभागीय प्रतिनिधी यांनी सदर कामाच्या अंदाजपत्रकाची प्रत मागवितो व तपासून घेतो अशी समितीला माहिती दिली. तसेच याबाबत कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जि.प. नंदूरबार यांनी सदर काम पूर्ण झालेले असल्याचे सांगून सदर कामासाठी रु.९.३३ लाख इतकी रक्कम खर्च झाली असून अकुशल कामाचे देयक बाकी असल्याचे सांगितले. त्यानंतर समितीने संबंधित अधिकाऱ्यांना अकुशल कामाचा निधी उपलब्ध करून द्यावा व त्यासंबंधीचा अहवाल समितीला द्यावा अशा सूचना केल्या. तसेच वन हरकतीमुळे २५ कामे वगळली आहेत, तर ११ कामे इतर कारणांमुळे का वगळण्यात आली ? यासंबंधी खुलासा करण्यास सांगितले असता, कार्यकारी अधिकारी, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, धुळे यांनी समितीला अशी माहिती दिली की, स्थानिकस्तरावर १९ अपूर्ण कामे होती. त्यापैकी ६ कामे पूर्ण होऊ शकतात. ८ कामे वन हरकतीमुळे बंद आहेत. जमिनीच्या मालकाने हरकत घेतल्यामुळे दोन कामे बंद आहेत, तर काही ठिकाणी मजूर मिळत नाहीत म्हणून कामे बंद आहेत. त्यामुळे सदर कामे वगळण्याचा प्रस्ताव पाठविला आहे.

समितीने चिंचपाडा पाझर तलावाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद यांनी अशी माहिती दिली की, भूसंपादनाच्या प्रस्तावास शेतकऱ्यांनी हरकत घेतल्यामुळे काम होऊ शकले नव्हते. तथापि, मध्यंतरीच्या काळात सदर जागेवर वस्ती झाल्यामुळे काम होऊ शकले नाही त्यामुळे सदर काम वगळण्याचे प्रस्तावित केले आहे. पाडळपूर येथील पाझर तलावाच्या कामाच्यासंदर्भात समितीची दिशाभूल करणारी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात समितीने निदेश दिले असता कार्यकारी अभियंता, ल.पा.जि.प यांनी अशी माहिती दिली की, पाडळपूर येथील पाझर तलावाची दोन कामे वेगवेगळी आहेत. यापैकी एक काम पूर्ण झाले आहे. तर दुसऱ्या कामाला शेतकऱ्यांनी हरकत घेतली आहे. त्यामुळे एक काम वगळण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे तसेच या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, या कामाची अंदाजपत्रकीय किंमत रुपये २.१० लाख असून सदर कामावर रुपये २.०८ लाख खर्च झाला आहे. त्यानुसार काम पूर्ण झाले असून पूर्णत्वाचा दाखला सादर केला आहे. त्यात शेतकरी जागा देत नाही अशी नजरचुकीने माहिती देण्यात आली आहे.

समितीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांच्या अपूर्ण कामाच्या सद्य:स्थितीबाबत विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांनी अशी माहिती दिली की, १० वर्षांपेक्षा जास्त कालावधी लोटलेल्या अपूर्ण कामांची संख्या ६ असून वन हरकतीमुळे सदर कामे बंद होती. सदर कामे पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून तसेच आदिवासी क्षेत्रांतर्गत प्राप्त निधीतून हाती घेण्यात आली असून सहापैकी तीन कामे पूर्ण झाली आहेत उर्वरीत कामे प्रगती पथावर आहेत. यानंतर जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, सदर कामे रोजगार हमी योजनेतून वगळण्याचा प्रस्ताव १३ एप्रिल २०१० रोजी सादर करण्यात आला आहे. सन २००५ मध्ये नवीन कायदा असल्यामुळे वन हरकत लागू होत नाही. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रगतीपथावर असलेली कामे किती दिवसात पूर्ण होतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांनी उर्वरीत कामे सहा महिन्यात पूर्ण करण्यात येतील अशी माहिती दिली, त्यावर समितीने सहा महिन्यांमध्ये कामे पूर्ण केल्यानंतर तत्संबधीचा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश दिले.

समितीने कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग या यंत्रणेकडील कामासंदर्भात १० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेल्या कामांची संख्या जवळपास १४ ते १५ आहे त्या संबंधात विचारणा केली असता कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदूरबार यांनी एकूण १५ कामांपैकी ११ कामांवर १० टक्क्यांपेक्षा कमी खर्च झालेला असल्यामुळे सदर ११ कामे वगळण्याचे प्रस्तावित केले आहे. अशी माहिती समितीला दिली. यावर समितीने ही बाब गंभीर असून जिल्हाधिकारी कार्यालयाला अपूर्ण कामाची माहिती संबंधित यंत्रणांनी माहिती नमुन्यामध्ये सादर केलेली नाही त्यामुळे कामे पूर्ण करण्यासाठी वेळ लागत आहे. **शासनाच्या कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रकार आहे. त्यामुळे यासंबंधीचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी त्वरीत समिताला सादर करावा असे निदेश समितीने दिले असता जिल्हाधिकारी यांनी एक महिन्यामध्ये सदर अहवाल सादर करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.**

त्यानंतर गाळ काढणे, गवत काढणे, शेततळी व गाव तलाव वगैरे कामे करण्यास महात्मा फुले जलभूमी अभियानाअंतर्गत या संदर्भातील तरतूद आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता, प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीला अशी माहिती दिली की, या कामांचे दोन प्रकार आहेत. महात्मा फुले जलभूमी मोहीम रोजगार हमी योजना हाती घेऊ शकते. त्यासंदर्भातील परिपत्रक निर्गमित करणार आहोत. प्रत्येक जिल्ह्यामध्ये हे लागू आहे. दुसऱ्या पद्धतीने म्हणजे नरेगाअंतर्गत मार्च २०११ मध्ये शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. ही कामे करण्यासाठी कोकणातील लोक पुढे येत नाहीत. त्यामुळे स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन या दोन्ही पद्धतींपैकी एका पद्धतीचा वापर करून ही कामे करावीत, अशी अपेक्षा आहे. त्यासंदर्भात समितीने असे सूचित केले की, गाळ काढण्याचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेतले पाहिजे. हा गाळ आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतात टाकण्यासाठी वाहून नेला पाहिजे. लातूर पॅटर्नप्रमाणे जर गाळ काढला गेला आणि शेतकऱ्यांनी आपल्या शेतात टाकला तर ज्या शेतीला १०-१५ हजार रुपये एकरी भाव मिळत नाही, त्या जमिनीला १ लाख रुपये एकर असा भाव मिळू शकतो अशी परिस्थिती काही जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेली आहे. लोकांनी ५०-५० ट्रॅक्टर गाळ आपल्या शेतामध्ये टाकला आहे त्याचा अतिशय चांगला फायदा त्यांना झाला आहे. काही जिल्ह्यातील तरुणांनी १०-१० जे.सी.बी.घेतले आहेत व त्या ठिकाणी गाळ काढण्याचे काम करून परिसरातील शेतांमध्ये टाकला आहे. शेतामध्ये गाळ टाकल्यामुळे जमिनीची उत्पादन क्षमता वाढते व तलावांमधील गाळ काढल्यामुळे तलावांची साठवण क्षमता वाढते, असा दुहेरी लाभ होतो. त्याचप्रमाणे तलावातील गाळाबरोबर रेतीही बाहेर येते व ती शेतामध्ये टाकल्यामुळे पाण्याचा निचरा होण्याची क्षमता वाढते त्यामुळे सर्व जिल्ह्यांनी विशेषत: नंदूरबार जिल्ह्याने गाळ काढण्याचे व तो गाळ शेतकऱ्यांच्या शेतात टाकण्याचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावे, असे समितीला प्रकर्षाने वाटते.

तसेच नर्मदा विकास विभागातील लोकांचे पुर्नवसन कोणत्या योजनेंतर्गत केले आहे असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी नर्मदा विकास विभागामार्फत नर्मदा खोऱ्यातील (स.स.प्र) प्रकल्प बाधीतांचे पुर्नवसन रोजगार हमी योजनेमधून करण्यात येत नसून नर्मदा पाणी तंटा लवादाच्या अंतिम निवाड्यानुसार व महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाच्या दिनांक २६ फेब्रुवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार करण्यात येत असल्याचे सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**समितीच्या नंदूरबार येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी जिल्ह्यात यंत्रणानिहाय अपूर्ण असलेली १ ते ५ वर्षातील १५ कामे आणि ६ ते १० वर्षातील २४ कामे तसेच १० वर्षावरील १० कामे अपूर्ण असून ही कामे कुशल कामांअभावी, वन हरकतीमुळे, जमीन मालकाच्या हरकतीमुळे मजुराअभावी, तर सुधारित अंदाजपत्रकामुळे अपूर्ण असल्याचे समितीला आढळले. अपूर्ण कामांबाबत आढावा घेताना समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, अपूर्ण कामे वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवणे योग्य नाही अशी कामे पूर्ण करण्यास विलंब लागत असल्यामुळे त्या कामांचा डीएसआर वाढला जातो. प्रस्तावित कामे वेळीच पूर्ण न झाल्यामुळे त्याची किंमत देखील वाढते व अशा वाढीव किमतीचा भुर्दंड नाहक शासनावर पडत असतो. म्हणून ज्या वर्षात यंत्रणेने कामे प्रस्तावित केली आहे व ज्यासाठी शासनाकडून निधी प्राप्त झाला आहे अशी कामे त्या-त्या वर्षात व त्यात विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण झाली पाहिजेत असा समितीचा आग्रह आहे. मंजूर कामाचा प्रस्ताव शासनाकडे वेळीच पाठविण्यात यावा व त्यावर शासनाने वेळीच निर्णय घ्यावा तसेच मंजूर कामाचा निधी वेळीच उपलब्ध करून देऊन अशी कामे पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करावी. संबंधित यंत्रणेकडे अपूर्ण असलेल्या कामांची सखोल चौकशी करून यामध्ये हेतुपुरस्सर कामे अपूर्ण ठेवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**समितीच्या मते, शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर अपूर्ण कामांची तपासणी होणे गरजेचे आहे. तसेच अपूर्ण कामांची पाहणी वेळीच केली नाही तर कामे अपूर्ण राहतील व ती पूर्ण होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विलंब होईल. म्हणून पर्यवेक्षकीय प्राधिकाऱ्याने अपूर्ण असलेल्या कामांची त्या-त्या वर्षात वेळीच तपासणी करून ते विहित मुदतीत पूर्ण करावी व त्यासाठी वाढीव निधी लागणार नाही याची दक्षता घेऊन संबंधित यंत्रणांना ते काम वेळीच पूर्ण करण्याचे आदेशित करावे. संबंधित यंत्रणांना त्यांना नेमून दिलेली कामे विहित मर्यादेत पूर्ण केल्यास त्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्यांना शाबासकी देऊन प्रोत्साहित करावे. त्याचप्रमाणे जी यंत्रणा त्यांना नेमून दिलेली कामे विहित मुदतीत पूर्ण करणार नाहीत, अशा यंत्रणांच्या अधिकाऱ्याच्या गोपनीय अहवालात प्रतिकूल शेरे देऊन व त्यांना सक्त ताकीद देऊन भविष्यात**

अशी अपूर्ण कामे वेळीच पूर्ण करण्याबाबत सूचना द्याव्यात. जेणेकरून यामुळे अशा अपूर्ण कामांवर पर्यवेक्षकीय प्राधिकाऱ्याने नियंत्रण ठेवल्यास संबंधित यंत्रणा कामामध्ये सुधारणा करून त्यादृष्टीने नेमून दिलेली कामे वेळीच पूर्ण करतील. यामुळे अपूर्ण कामांवर वाढीव निधी खर्च होणार नाही. त्यामुळे शासनाच्या तिजोरीवर देखील अधिकच्या निधीचा भार पडणार नाही, अशी समितीला आशा वाटते.

नंदूरबार जिल्ह्यामध्ये असलेली अपूर्ण कामे ही मूळ रोजगार हमी योजनेतून हाती घेण्यात आलेली आहेत. आता राज्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू झाल्यामुळे यापुढे जुन्या रोजगार हमी योजनेतून कामे घेतली जाणार नाहीत. त्याचप्रमाणे राज्य शासनाने सुद्धा एक धोरण ठरवून जी जुन्या रोजगार हमी योजनेतील अपूर्ण कामे आहेत ती सर्व अपूर्ण कामे सन २०१२ पर्यंत पूर्ण करावी असा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे व सर्व जिल्ह्यातील कार्यान्वित यंत्रणांकडून कोणती कामे होऊ शकतात त्यासाठी एक निश्चित कालावधी ठरवून त्याचा एक कार्यक्रम तयार केलेला आहे. हे लक्षात घेता समिती अशी आग्रहाची शिफारस करते की, राज्य शासनाने ठरविलेल्या कार्यक्रमानुसार सर्व अपूर्ण कामे सन २०१२ पूर्वी पूर्ण करावी. शेततळयासंदर्भात शासनाने निकष बदलण्याची आवश्यकता आहे. सध्या अस्तित्वात असलेले निकष बदलले तर शेततळयांची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी करता येईल.

शेततळयासंदर्भात विशेष लक्ष्य घालून आदिवासी शेतकऱ्यांना जेवढा फायदा करून देता येईल तेवढा करून द्यावा. शेततळयांची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेतली तर जमिनीतील पाण्याची पातळी वर येईल त्यामुळे शेतकऱ्यांच्या विहिरीचे पाणी टिकून राहील आणि त्यांना शेतीचे उत्पादन घेता येईल. इतर ठिकाणी होत असलेल्या कामांच्या ठिकाणांची माती, मुरुमाचा गौण खनिज म्हणून वापर केल्यास त्यासाठी स्वामित्वधनाची आकारणी करणे योग्य होईल. परंतु जेथे काम सुरू असेल तेथील माती दुसऱ्या ठिकाणी नेऊन टाकली तर त्याचा स्वामित्वधन म्हणून कर लावणे संयुक्तिक होणार नाही. या ठिकाणी कर लावण्याबाबत शासन निर्णय संदिग्ध आहे.शासन निर्णयाचा अर्थ चुकीचा लावला जातो, सबब, या अनुषंगाने तातडीने स्वयंस्पष्ट व सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा, अशीही समितीची शिफारस आहे.

४) जवाहर विहिरी :

दिनांक ५ व ६ जानेवारी २०११ रोजी नंदूरबार जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेनुसार सन १९८८-१९८९ ते २०१०-२०११ या कालावधीतील जवाहर विहिरीची माहिती "निरंक" दाखविण्यात आली त्यावर समितीने अशी विचारणा केली की, एका गावात ५० ते १०० विहिरी बांधता येतात. विहिरी या वैयक्तिक लाभाच्या योजनेमध्ये बसतात. जवाहर विहीरीसंदर्भात माहिती निरंक असल्याची कारणे काय ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विहिर बांधतांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होत नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु याकरिता दाखल्याची आवश्यकता असते.

यासंदर्भात समितीने १७ नोव्हेंबर २०११ रोजी विभागीय प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेतली. त्यावेळी समितीला देण्यात आलेल्या माहितीनुसार समितीने नंदूरबार जिल्ह्यामध्ये विहिरीचे काम करण्याकरिता तांत्रिक मंजूरी मिळत नाही त्याची कारणे कोणती व ती सोडविण्यासाठी शासन स्तरावर काय प्रयत्न करण्यात येत आहेत ? अशी विचारणा केली असता त्यावर जिल्हाधिकारी, यांनी अशी माहिती दिली की, जिल्ह्यात विहिरींच्या कामांना तांत्रिक मंजूरी देण्यास कोणतीही अडचण नाही. जिल्ह्यात आजपर्यंत ८०९ जवाहर विहिरींना व महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत ६६५ सिंचन विहिरींना प्रशासकीय मान्यता दिली आहे. सद्यःस्थितीत जवाहर विहिरींची ७८५ व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनाअंतर्गत २४९ सिंचन विहिरींची कामे प्रगतीत आहेत. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, त्यात सन २००६-०७ मधील अनेक जुन्या विहिरींचा समावेश आहे. त्यावर प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, बऱ्याच विहिरींना पाणी लागलेले आहे. परंतु काही विहिरींच्या संदर्भात पाण्याच्या खोलीची पातळी खूप आहे त्यावर खर्च वाढत आहे. त्यामुळे आहे त्याच परिस्थितीमध्ये विहिरी पूर्ण करीत आहोत. शेतकरी सदर योजनेचा फायदा घेत आहेत. त्यावर समितीने असे विचारले की, पाण्याच्या खोलीच्या पातळीसाठी किती खर्च होत आहे? त्याचप्रमाणे राज्यात ६ लाख ३० हजार शेतकऱ्यांनी विहिरींची विद्युत जोडणी घेतली. परंतु त्या अनुषंगाने एक रुपयाची रक्कम सुद्धा भरलेली नाही. अशा प्रकारे एकूण १८०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, शेतकरी सदर योजनेचा फायदा घेत आहेत. नवापुर तालुक्यात टीएसपी व जवाहर विहिरीच्या संदर्भात सांगावयाचे झाल्यास तेथील ४५० विहिरींना पाणी लागले आहे. त्या भागातील सिंचनाचे प्रमाण पूर्वीपासून कमी आहे. शासनाच्या कार्यक्रमातून सदर विहिरी दिल्या जातात. त्या भागात पाणी व तलावांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे अशी समितीला माहिती दिली. शिरपूर येथील पाण्याची पातळी कशी आहे ? तेथे जलसंधारण कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी करून त्यासाठी विशेष निधी राखून ठेवला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रधान सचिव नियोजन विभाग (रोहयो) यांनी अशी माहिती दिली की, शिरपूर पॅटर्न म्हणजे नाल्याच्या ठिकाणी खोलवर खोलीकरण करून पाणी अडवण्याची योजना आहे. सध्या या पॅटर्नचे अनेकजण कौतुक करतात. हाच पॅटर्न २-३ ठिकाणी सुरू करण्यासंबंधी मागणी केलेली आहे. याच पॅटर्नसंदर्भात त्रिसदस्यीय समिती कार्यरत आहे. त्यात भूजल सर्व्हेक्षण विभागाचे अधिकारी, कृषी अधिकारी तसेच डॉ. घाटे प्रसिद्ध तंत्रज्ञ कार्यरत आहेत. यामध्ये सुरुवातीच्या काळात जमिनीमध्ये पाणी मुरण्याचे प्रमाण जास्त असते. परंतु कालांतराने पाण्यासमवेत वाहून येणाऱ्या गाळामुळे

जमिनीतील छिद्रे बंद होवू शकतात. परिणामी जमिनीत पाणी मुरण्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर घट होण्याची शक्यता आहे. सदर उपक्रम चांगला असला तरी दीर्घ काळासाठी राबविणे जोखमीचे आहे. याबाबत त्रिसदस्यीय समितीने सविस्तर अहवाल सादर केलेला आहे. सदर पॅटर्नसंबंधी श्री.खानापूरकर व संबंधित तंत्रज्ञ यांच्यामध्ये ४ तास चर्चा झाली होती या सर्व बाबींचा विचार करून शासनाने हा पॅटर्न १-२ ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याचे ठरविले आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, पाण्याचे पर्क्यूलेशन झाले नाही तर भविष्यात लोकांना अडचणी निर्माण होतील या पॅटर्नमुळे काही लोकांना फायदा व काहींना तोटा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यावर विभागीय प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीला अशी माहिती दिली की, हा प्रयोग यशस्वी झाल्यास इतर ठिकाणी सुद्धा तो सुरू करता येईल. वरुड मोर्शी येथे हा पॅटर्न प्रायोगिक तत्त्वावर सुरू करीत आहोत. त्यानंतर त्याचा शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास केला जाईल. तद्नंतर सदर पॅटर्न पुढे राबवावयाचा किंवा कसे ? यासंबंधी शासन स्तरावर निर्णय घेतला जाईल. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, वरुड मोर्शी मध्ये सदर पॅटर्न राबविण्यासंबंधी समितीचे काही म्हणणे नाही. परंतु त्यासमवेत नांदगाव, खांडेश्वर येथेसुद्धा सदर पॅटर्न प्रायोगिक तत्त्वावर सुरू करावा कारण नांदगाव, खांडेश्वरपेक्षा वरुड मोर्शीचे दरडोई उत्पन्नसुद्धा जास्त आहे. म्हणून लोकहितासाठी हा पॅटर्न नांदगाव, खांडेश्वर येथेसुद्धा सुरू करावा अशी समितीने सूचना केली. त्यावर विभागीय प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीला असे सांगितले की, समितीने जी सूचना केली आहे त्याची नोंद घेतलेली आहे. त्यासंबंधी जीएसडीए समवेत चर्चा करावी लागेल.

अभिप्राय व शिफारस :

**नंदूरबार जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेली जवाहर विहिरी संदर्भातील माहिती "निरंक" दाखविण्यात आली असून या विहिरींचा वैयक्तिक लाभाच्या योजनेत समावेश करण्यात आल्याचे सांगितले. नंदूरबार जिल्ह्यात आतापर्यंत ८०९ जवाहर विहिरी व महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत ६६५ सिंचन विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या असून सध्या सुधारित जवाहर विहिरी ७८५ व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत २४९ सिंचन विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. समितीला दिलेल्या माहितीनुसार जिल्ह्यात अपूर्ण असलेल्या विहिरी तसेच प्रगतीपथावर असलेल्या विहिरी तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यात यावे व त्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**शिरपूर पॅटर्ननुसार नाल्याच्या ठिकाणी खोलवर खोलीकरण करून पाणी अडविण्याच्या योजनेसंदर्भात शास्त्रीय अभ्यास करून सदर पॅटर्न राबविण्यासाठी शासनस्तरावर तातडीने निर्णय घेण्यात यावा व याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशी ही समिती शिफारस करीत आहे.**

५) सुधारीत अंदाजपत्रक :

समितीच्या दिनांक ५ व ६ जानेवारी २०११ रोजी नंदूरबार येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्यावेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीपुस्तिकेमध्ये सुधारित अंदाजपत्रकात माहिती " निरंक " दाखविण्यात आली आहे.

त्यासंदर्भात वडफळ्या, तालुका अक्राणी येथील कामात ८ महिन्यांपासून तांत्रिक मान्यता न देण्याची कारणे काय आहेत? अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदूरबार यांनी दिनांक २३ जून २००९ रोजी ५८.०० लाख रुपयांस तांत्रिक मान्यता मिळालेली आहे तसेच दिनांक १० जुलै २००९ रोजी सुधारित अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले. परंतु, पुन्हा दरसूची बदलल्यामुळे अद्ययावत दरसूचीनुसार रुपये ७५.७३ लाख किमतीचे अंदाजपत्रक तयार करून दिनांक २६ एप्रिल २०१० च्या पत्रान्वये तांत्रिक मंजूरीसाठी पाठविले असून अंतिम मंजूरी जानेवारी २०११ अखेर मिळणार आहे. त्यावर सन २००९ पासून मंजूरी मिळाली नाही ती आता मिळणार आहे काय? असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता, नर्मदा विकास विभाग, नंदूरबार यांनी मंजुरी मिळण्यासाठी प्रयत्न केलेला आहे असे समितीला सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीत सुधारित अंदाजपत्रक या बाबीसंदर्भात माहिती " निरंक " दाखविण्यात आली असून त्यानंतर समितीला दिलेल्या माहितीत रु.७५.७३ लाख रकमेचे सुधारित अंदाजपत्रक सन २००९ मध्ये शासनास सादर केले असून अद्यापपर्यंत त्यास मान्यता दिली नसल्याचे समितीस आढळून आले आहे. शासन स्तरावर सन २००९ पासून सुधारित अंदाजपत्रकाच्या मंजूरीस झालेल्या विलंबासंदर्भात समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून जिल्ह्याच्या यंत्रणेकडून प्रस्तावित केलेल्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यासंदर्भात विलंब न करता ते प्रस्ताव तातडीने मंजूर करावेत अशी समितीची शिफारस आहे.**

**६) गैरव्यवहाराची प्रकरणे :**

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक ५ व ६ जानेवारी, २०११ रोजी नंदूरबार जिल्हा बैठकीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहितीनुसार गैरव्यवहाराची १९ प्रकरणे विविध स्तरावर प्रलंबित आहेत. (परिशिष्ट २ पहावे) याचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे :–

| अनु- क्रमांक | यंत्रणेचे नांव | कोणत्या स्तरावर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
